॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**विकास विभाग**

**जा.क्रं./कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७६/२०२५** **दि.०९/१२/२०२५**

**<u>अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित</u>**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**

**विषय :-** विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालये व मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करणे संदर्भात मुदतवाढ देण्याबाबत.....

**संदर्भ :-** विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३५९/२०२५, दि.२४/११/२०२५.

**महोदय/ महोदया,**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ञ) व ११७ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे/ परिसंस्था तसेच स्वायत्त महाविद्यालये/ परिसंस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) योग्यती माहीती विहीत नमुन्यात Online व्दारे भरण्याबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात आले आहे. तसेच संपूर्ण माहीती भरतांना शैक्षणिक अंकेक्षण शुल्क भरल्यानंतर महाविद्यालयांने Certificate वर प्राचार्यांची स्वाक्षरी घेऊन फी भरल्याच्या पावतीसह Hard Copy विद्यापीठात दि.१०/१२/२०२५ पर्यंत जमा करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तथापी काही महाविद्यालये/ परिसंस्था यांनी मेल व्दारे व काही महाविद्यालयांनी दुरध्वनी व्दारे विद्यापीठाकडे संपर्क करून माहीती भरण्यास तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे मुदतवाढ मिळण्याबाबत मागणी करण्यात येत आहे. सदर बाब लक्षात घेता, शैक्षणिक अंकेक्षणाची माहीती भरण्यासाठी **दि.२२/१२/२०२५ पर्यंत** मुदत वाढ देण्यात येत आहे. विद्यापीटात माहिती पाठवितांना त्यासोबत अनुक्रमणिका (Index) तयार करुन कागदपत्रांना नंबरींग करुन त्याची माहीती अनुक्रमणिकेत त्या त्या मुद्यासमोर पेज नंबर नमुद करुन अपलोड केलेल्या कागदपत्रांसह परिपुर्ण माहिती पाठवावी, ही विनंती.

तसेच आपणास काही तांत्रीक अडचणी असल्यास त्याचा Screenshot कृपया **support@nmu.ac.in** ई-मेलवर पाठवावा. किंवा ०२५७-२२५७४५३ या दुरध्वनीवरून संपर्क साधु शकतात, तसेच विहीत नमुना व माहीती भरण्यासंबंधी काही अडचणी असल्यास **development@nmu.ac.in** ई-मेल करावा किंवा ०२५७-२२५७२२५ वर संपर्क साधावा, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रवीण चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.)
विकास विभाग

**प्रत माहितीसाठी सादर:-**

१. मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा.संचालक, आय. क्यु. ए. सी. विभाग, कबचौउमवि, जळगाव
४. मा.पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव